## पहिली खबर
## FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र    जिल्हा District: मुंबई    पोलीस ठाणे Police Station: भा. प्र. वि    पहिली खबर क्र. FIR No.: ९५    वर्ष Year: २०२६    दिनांक Date: २२/०५/२०२६

2. (i) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ............ तारीख पासून Date from २४/१२/२५ वेळ Time – तारीख पर्यंत Date to – वेळ Time २८/१२/२५

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २४/१२/२०२५ वेळ Time १०:३०

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. १८ तारीख Date २२/०५/२०२६ वेळ Time १२:४५

4. माहितीचा प्रकार Type of Information ............ लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ............
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O. P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road: नेक्सस लेवल फुड कुक, शॉप नं-०१, शिवाजी मेंशन बिल्डिंग, ऑक्सिस बँक जवळ, एल. जे. रोड, बाबा (कापड) जवळ, माहिम (प) मुं-१६

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: मनोज हरिश्चंद्र गोडसे    (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: हरिश्चंद्र गोडसे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ............    (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय    फोन नं Phone No.: ९८२१७०३५३५८६

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ............ दिल्याचा दिनांक Date of issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ (f) व्यवसाय Occupation ............

(g) धर्म Religion: हिंदू    जात Caste ............    जनजात Sub-Caste ............

(h) पत्ता Address, गल्ली/सर्व्हे नं. Ward, घर/नाव नं. House Name No., फोन/मो. नं. Phone No., पॅन नं. Pan No., कार्ड नं. Card No.: रुम.नं-२८, बिल्डिंग क्र. ०१, पोलिस अधिकारी वसाहत, कार्टर रोड, वांद्रे (प) ४०००५०

रस्त्याचे नाव Road ............ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ पो. स्टे. P. Stn. ............

तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............ सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

नितीन कवले, अधिक्षक इलेक्ट्रीक विभाग, दादर (पूर्व) मुंबई

(G.C.P.) K 1043 (A) (1000–1-2025)

जबाब दि. 22/05/2026

श्री. मनोज हरिश्चंद्र गोडसे, वय- 45 वर्षे, धंदा:- नोकरी, ( पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई, वरळी ), रा.ठी.-रूम नं. 24, बिल्डिंग क. 1, पोलीस अधिकारी वसाहत, कार्टर रोड, वांद्रे (प), मुंबई. मो.नं. 9821737379.

मी वरीलप्रमाणे असून नमूद पत्त्यावर माझे कुटुंबासह राहत आहे. मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे दि. 07/10/2025 रोजी पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि. 24/12/2025 रोजी तकारदार नामे श्री. शादाब मोहम्मद जावेद सय्यद, वय 34 वर्षे, धंदा- व्यवसाय (नेक्स्ट लेवल फुड कॅफे), रा.ठि. रूम नं. 298, स्कॉटर्स कॉलोनी, चिंचोली गेट, मेन रोड, मालाड, मुंबई हे समक्ष ला.प्र.वि. कार्यालय, वरळी, मुंबई येथे आले. तकारदार यांनी मा. अपर पोलीस आयुक्त, लाप्रवि मुंबई यांच्या नावे दिलेला स्व:हस्ताक्षरातील व सही केलेला लेखी तक्रारी अर्ज सादर केला. त्यावर मा. अपर पोलीस आयुक्त, लाप्रवि मुंबई यांनी आम्हास तक्रारदार यांच्या अर्जामध्ये नमुद तक्रारींबाबत चौकशी करुन पुढील कारवाई करणेबाबत आदेशित केले.

मा. वरिष्ठांनी आदेशित केलेप्रमाणे आम्ही पर्यवेक्षक अधिकारी पो.नि. कृष्णा मेखले यांचेसमवेत अर्जदार यांचेकडे त्यांच्या अर्जाचे अनुषंगाने चौकशी केली असता तकारदार यांचे शॉप नं. 01, रिजवी मेंशन, बिल्डींग, ॲक्सीस बॅक जवळ, लेडी जमशेदजी रोड, बाबा फालुदा जवळ, माहिम (प), मुंबई -16 येथे नेक्स्ट लेवल नावाचे फुड कॅफे शॉप असुन सदरचा शॉपचा गाळा हा त्यांनी दि. 01/02/2025 पासुन भाडयाने घेतला आहे. त्याबाबत त्यांनी भाडे करार केला आहे. सदर भाडे करारात असे स्पष्ट लिहिले आहे कि, गाळ्याच्या भाडयाचे सोबत पाण्याचे व विजेचे बिल भरावयाचे आहे. मागील सर्व विजेची बिले भरली असुन फक्त 3 महिन्याचे विजेचे एकुण रु. 45,280/- रक्कमेचे बील थकीत होते. पैशांच्या अडचणी मुळे त्यांना विजेचे बिल भरणे शक्य झाले नव्हते. त्यामुळे बीईएसटी इलेक्ट्रिक विभागाचे कर्मचारी श्री. नितीन कावले व श्री. राजेश सिंग हे वारंवार मोबाईल फोनव्दारे तकारदाराला संपर्क करुन विजेचे मिटर बंद करून घेवुन जाणार असे धमकावुन त्यांच्याकडे रू.3000/- इतक्या रकमेची लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लोकसेवकास लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक 24/12/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात समक्ष येवून स्वहस्ताक्षरातील हिंदीतुन लिहीलेला तक्रार अर्ज दिलेला असल्याचे तक्रारदार यांनी आम्हास सांगितले.

पर्यवेक्षण अधिकारी पो.नि. मेखले यांचेसमवेत चर्चा करुन तातडीने पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार प्रभारी अंमलदार पो.ह. 960264/ शेमडकर यांना पंचांची तसेच पथकाची नियुक्ती करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. आम्ही दिलेल्या सुचनांप्रमाणे पंच व पडताळणी पथकाची नियुक्ती केल्यानंतर काही वेळातच दोन शासकीय पंच क्र. 1 - श्री. ओम गंगाधर मोरे ( राज्यकर निरीक्षक ), पंच क्र. 2 - श्री. वैभव सहदेव घाडी ( महसूल सहाय्यक ) हे आमचे दालनात उपस्थित झाले. नमुद दोन्ही शासकीय पंचांची आम्ही ओळख करुन घेतल्यानंतर त्यांची तक्रारदार यांचेशी ओळख करुन देवून दि. 24/12/2025 रोजीचा तक्रारदार यांच्या तकार अर्जाबाबत पंचाना समजावून सांगून तकारदार यांचा तकार अर्ज पंचाना वाचण्यास दिला. त्यानंतर सदर तकार अर्जावर पंचाच्या सहया घेण्यात आल्या व समक्ष म्हणुन आम्ही स्वाक्षरी केली.



Scanned with OKEN Scanner

फिर्यादी पो.नि. श्री मनोज गोडसे यांचा दि. 22/05/2026 रोजीचा जबाब पुढे चालु.....

तदनंतर दि. 24/12/2025 रोजी आम्ही, पर्यवेक्षण अधिकारी पो.नि. मेखले, तक्रारदार श्री. शादाब सय्यद, दोन शासकीय पंच, तसेच पडताळणी पथकासह कारवाईकरीता लोकसेवक यांना भेटण्याकरीता जाण्यापुर्वी त्यांना मोबाईलवर संपर्क साधण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर तकारदार व पंचांसह गोपनिय कक्षात गेलो असता पो.ह.क. 031200/ रावराणे हे तिथे हजर होते. आमचे मागणी वरुन त्यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सादर केला. डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये कोणत्याही प्रकारचे फाईल्स नसल्याची पंचांसमक्ष खात्री करण्यात आली. त्यानंतर त्याचा वापर करुन तक्रारदार यांचे मोबाईल 9004585960 वरुन लोकसेवक कावले यांचे मोबाईल नंबर 7039739257 वर व्हॉटस् ॲप व्हॉईस कॉल केला असता लोकसेवक कावले यांनी 'ते व्यस्त असल्याचे व नंतर फोन करेन' असे तकारदारास सांगितले. त्याचा पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर तकारदार हे दि. 26/12/2025 रोजी पडताळणी कारवाई करिता हजर झाले असता आम्ही ला.प्र.वि. मुंबई कार्यालयातील गोपनीय कक्षामध्ये जावुन डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर च्या साहय्याने दोन शासकीय पंचासमक्ष तक्रारदार यांच्या मो.क. 9004585960 वरुन लोकसेवक यांना मो.क. 7039739257 वर व्हॉटसअप कॉल करुन लोकसेवक नितीन कावले यांच्याशी संपर्क करण्यात आला. त्यावेळी लोकसेवक कावले व तकारदार शादाब सय्यद यांच्या दरम्यान झालेल्या संभाषणामध्ये तक्रारदार सय्यद यांनी लोकसेवक कावले यांना असे विचारले कि,"**तो अभी मुलाकात हो सकती है क्या सर?**" त्यावर लोकसेवक कावले हे तक्रारदार यांस म्हणाले कि," **मै क्या बोल रहा हु संतोष येलवे को पहचानते है ना आप, उसको भेज देता हु, मै वो दे देंगा साहब को, मै डयुटी पे नही आया आज, तबियत नही बराबर मेरा इसीलिये, हा तो उनको भेज दुंगा, तो वो कलेक्ट कर लेंगे, ठिक है**"

काही वेळाने तक्रारदार यांनी दोन शासकीय पंचासमक्ष लोकसेवक संतोष येलवे यांच्याशी व्हॉट्सअप वर मोबाईलव्दारे संभाषण झाले त्यामध्ये लोकसेवक संतोष येलवे यांनी तक्रारदार यांस म्हणाले कि, "**उन्होंने बोला कुछ जाते जाते कलेक्ट करो, आप तो वही पिझ्झावाले ना**" त्यावर तक्रारदार हे लोकसेवक संतोष येलवे यांस विचारले कि," **हा हा, तो क्या करना है सर ? वो उन्होंने क्या बोले ?**" त्यावर लोकसेवक संतोष येलवे यांनी तक्रारदार यांस म्हणाले कि,"**हं, क्या बोले बोले तो, आपको कुछ बोले ना, मेरे को बोले की आप जाके उनसे कलेक्ट करके ही जाना, बाकी मेरे को कुछ बोला नही है उसने, मै दादर मे है बोला ना, मेरा जैसे जॉब खतम होगा, वैसे मै आऊंगा, आने से पहिले कॉल करुंगा, मेरे को रिक्वेस्ट किया के तु घर जाते वक्त उनसे ले लेना, अभी तुम नही बोल रहा है तो मै कावले को बोलेगा की नही बोल रहा है वो, ठिक है,**"

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार सय्यद हे ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात असताना लोकसेवक कावले यांनी तक्रारदार यांच्या मोबाईलवर व्हॉट्सअप कॉल केला. सदरवेळी झालेल्या संभाषणादरम्यान लोकसेवक कावले यांनी तक्रारदारास म्हटले कि, "**वो आपने लडके के पास रख्खा ना पैसे की नही रख्खा?, तो मै उनको भेजु क्या फिर अभी?, नही नही खाली आप पैसे देदो बस,**" त्यानंतर तक्रारदार लोकसेवक कावले यांस विचारले कि," **तो सर कितना देदु मै उनको**" त्यावर लोकसेवक कावले तक्रारदार यांस म्हणाले कि,"**लगे तो पाचसौ रुपया कम देदो, मै पाचसौ रुपया डाल दुंगा, अभी ढाई देदो, मै दे दुंगा पाचसौ साहब को और मेरे पास से '**, त्यावर तक्रारदार विचारले "**ढाई हजार ?**" त्यानंतर लोकसेवक कावले म्हणाले "**हां", साहब को ही देना है, खाली पैसे ल्यो, वो आपके भाई जो है लडका उसके**



Scanned with OKEN Scanner

**पास देदो वो वहा से कलेक्ट कर लेगा और साहब को दे देगा, मै बोलुंगा भाई पाचसौ रुपया बाद मे देता हु मै''** असे म्हणाले.

त्यानंतर लोकसेवक संतोष येलवे यांनी त्यांचे मो.क्र. 8291910099 तक्रारदार शादाब सय्यद यांचे मो.क्र. 9004585960 वर व्हॉटसअॅप कॉल केला व त्यांच्यामध्ये मोबाईल संभाषणामध्ये लोकसेवक संतोष तक्रारदारांस म्हणाले कि,'' **अरे क्या इधर मै शॉप के इधर आया हु, अरे मुझे कावले ने भेजा है, क्या कर रहे है बोलो, तो अभी मेरे को बोला मिटर निकालके ला''** असे म्हणाले, परंतु त्यावेळी तकारदार हे फुड कॅफे मध्ये उपस्थित नव्हते. ते मालाड येथे असल्याचे तकारदाराने त्यांना सांगितले. त्यानंतर संतोष येलवे हे तात्काळ तक्रारदार यांचे दुकानाचे इलेक्ट्रीक मिटर काढुन घेवुन गेले. त्यावेळी तकारदार यांनी लोकसेवक नितीन कावले यांना मोबाईलद्वारे व्हॉटसअॅप वरुन संपर्क करुन संतोष येलवे यांनी मीटर काढुन घेवुन गेल्याचे सांगितले व मीटर पुन्हा लावण्यास सांगण्याची विनंती केली. त्यावेळी लोकसेवक नितीन कावले यांनी तकारदारास दुस-या दिवशी सकाळी बेस्ट कार्यालय, दादर येथे जावुन वीज मीटर बील भरुन सुर्यबल्ली यादव साहेबांना भेटण्यास सांगितले. तक्रारदार व लोकसेवक कावले यांचेमध्ये मोबाईलवर व्हॉटस्अॅप कॉलवर झालेल्या संभाषणामध्ये लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे 2,500/- रु. लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले.

लोकसेवक यांनी तक्रारदार यांना सांगितलेवरुन दिनांक 27/12/2025 रोजी लोकसेवक यांचे कार्यालयात जावून प्रत्यक्ष भेट घेण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार दिनांक 27/12/2025 रोजी आम्ही पर्यवेक्षण अधिकारी पो.नि. मेखले, तक्रारदार श्री. शादाब सय्यद, दोन शासकीय पंच, तसेच पडताळणी पथकासह कारवाईकरीता लोकसेवक यांना भेटण्याकरीता त्यांचे कार्यालयात जाण्याचे ठरविण्यात आले. नमुद कार्यालया जवळ गेल्यावर दोन शासकीय पंचासमक्ष तक्रारदार यांचे मोबाईलवर संपर्क साधुन त्यांनी सांगितल्याप्रमाणे पुढील सापळापुर्व/सापळा कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. लोकसेवक यांच्या कार्यालयात जावून तकारदार यांनी थकीत बीलाचा भरणा केला व तेथील इतर लोकसेवक सुर्यबल्ली यादव यांची भेट घेवून बीलाचा भरणा केल्याबाबत सांगितले. त्यानंतर लोकसेवक सुर्यबल्ली यादव यांनी श्री. राजेश सिंग यांना मीटर बसवून देणेबाबत सुचना दिल्या. तदनंतर मी केलेल्या सुचनेनुसार डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन एस.डी कार्ड टाकून सदर व्हॉईस रेकॉर्डर सुरु केले. तकारदाराने राजेश सिंग यांना संपर्क केला असता इसम नामे राजेश सिंग यांनी तकारदाराला बीईएसटी कार्यालया बाहेर गेट नं.3 जवळ येण्यास सांगितले, त्याप्रमाणे तकारदार राजेश सिंग यांस बीईएसटी कार्यालया बाहेर भेटण्या करीता पंच घाडी यांचेसह पायी चालत गेले, तिथे राजेश सिंग व शिंदे नावाचे इसम हे तकारदाराला बीईएसटी कार्यालया बाहेर गेट नं.3 समोर रस्त्यावर भेटले. त्यावेळी तकारदाराने राजेश सिंग यांस इलेक्ट्रीक बिल भरल्याचे सांगितले. त्यावर राजेश सिंग यांनी '**आप दुकान पे पहुंचो, मिटर लगने जा रहा है**' असे सांगितले.

त्यानंतर तक्रारदार यांनी मो.क्र. 9004585960 वरुन लोकसेवक कावले यांना मो.क्र. 7039739257 वरुन व्हॉटसअप कॉल केला त्यादरम्यानचे डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन तकारदार यांच्या मोबाईल फोनव्दारे व्हॉटसअप कॉल करुन लोकसेवक यांच्याशी संपर्क केला. सदरचे लोकसेवक व तक्रारदार यांचे मधील मोबाईलव्दारे व्हॉटसअप कॉलचे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात आले. लोकसेवक कावले यांची प्रत्यक्ष भेट न झाल्याने तक्रारदार यांचे मोबाईलवरुन लोकसेवक यांना व्हॉटस् अॅप कॉलद्वारे संपर्क साधून राजेश सिंग हे इलेक्ट्रीक मिटर लावण्यासाठी कॅफे शॉप मध्ये जात



Scanned with OKEN Scanner

फिर्यादी पो.नि. श्री मनोज गोडसे यांचा दि. 22/05/2026 रोजीचा जबाब पुढे चालु.....

असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक कावले तक्रारदारांस म्हणाले," हजार, हजार रुपया देदो, वो मेहनत उनका लगता ही है ना उनका, हॅलो, हजार रुपया देदो, वो अपना काम छोडके आये ना आपके लिये, यावर तक्रारदार लोकसेवकास म्हणाले कि, 'अच्छा और जो आपके लिये सर को पैसा ढाई हजार था, वो भी देदु उनको, आपने जो बोले थे , त्यावेळी लोकसेवक कावले तक्रारदारांस म्हणाले, 'नही नही, किसीको, किसीको कुछ नही देनेका वो आप रखो, अभी उनको हजार रुपया उनका मेहनताना जो है अभी लगाने का वो देदो, ठिक है" दरम्यान राजेश सिंग यांनी तक्रारदाराच्या कॅफे शॉपचा वीज मीटर परस्पर लावुन टाकला. सदरवेळी लोकसेवक कावले हे दुस–या विभागात कर्तव्यास असल्याने त्यांची तक्रारदारासोबत भेट झाली नाही. तसेच लाचेची रक्कम स्विकारण्याबाबत लोकसेवक कावले यांनी असमर्थता दाखविल्याने व तक्रारदार यांचे इलेक्ट्रीक मिटर परत लावले गेल्याने सापळापुर्व/ सापळा कार्यवाही स्थगित करण्यात आली.

दि. 27/12/2025 रोजीच्या तक्रारदार शादाब सय्यद यांनी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात येवून नोंद केलेल्या जबाबामध्ये त्यांचे प्रलंबित असलेले थकित विज बिल रक्कम भरल्याने विद्युत मिटर जोडणीचे काम पुर्ण झाले असून लोकसेवक कावले सध्या त्यांचेकडून पैसे स्विकारण्याची शक्यता कमी असल्याने काही दिवस कारवाई स्थगित करण्याबाबत विनंती केली. त्याप्रमाणे काही दिवस सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.

दि. 17/02/2026 रोजीच्या तकारदार श्री.शादाब सय्यद समक्ष कार्यालयात आले असता त्यांचा जबाब नोंद करण्यात आला त्यावेळी त्यांनी सांगितले की, 'पडताळणी कारवाई नंतर लोकसेवक नितीन कावले यांनी त्यांचेशी संपर्क केलेला नाही किंवा त्यांना समक्ष भेटलेले नाहीत. त्यामुळे लोकसेवक नितीन कावले हे आता रु.2,500/– लाचेची रक्कम त्यांचेकडुन स्विकारतील असे त्यांना वाटत नाही, परंतु लोकसेवक नितीन कावले यांनी त्यांचेकडे रु. 2,500/– लाचेची मागणी केली म्हणुन त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई व्हावी' अशी विनंती केली आहे.

तरी यातील तक्रारदार श्री. शादाब सय्यद यांना पैश्यांच्या अडचणीमुळे त्यांचे फुड कॅफे दुकानाचे विजेचे 3 महिन्यांचे एकुण 45,280/– रुपये थकीत बिल भरणे शक्य झाले नाही. त्यामुळे तकारदार शादाब सय्यद यांना बीईएसटी इलेक्ट्रिक विभागाचे कर्मचारी श्री. नितीन कावले यांनी थकीत विजेचे बील न भरल्याने वीज मिटर बंद करुन कादुन घेवुन जाणार असे सांगुन रु.3,000/– लाचेची मागणी केली व तडजोडी अंती रु.2,500/– स्विकारण्याचे मान्य केले. बीईएसटी चे कर्मचारी लोकसेवक श्री. नितीन कावले यांनी मोबाईलवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडून रु.2,500/– रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने माझी सरकारतर्फे लोकसेवक श्री. नितीन कावले यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम 7 अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

(अशोक गवांरी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

MGodse
22/05/2026

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे तक्रारदार लोकसेवकाविरुद्ध पडताळणी करून निष्पन्न बाबीवरून आलेले पैसे स्विकारण्याची शक्यता वाटत असल्याने

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील तक्रारदार श्री. शादाब मोहम्मद जावेद सय्यद यांचे नेक्स्ट लेवल फुड कॅफे दुकानाचे विजेचे ३ महिन्यांचे एकुण ४५,२८०/- रु. थकित बील न भरल्याने बीईएसटीचे कर्मचारी लोकसेवक नितीन कावले यांनी तक्रारदार शादाब सय्यद यांना वीज मिटर बंद करून काढून घेवून जाणार अशी भिती दाखवून रु. 3000/- लाचेची मागणी केली व लोकसेवक यांच्याशी मोबाईल वरून करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडून 2,500/- स्विकारण्याचे मान्य केल्याने निष्पन्न झाल्याने लोकसेवक नितीन कावले यांच्या विरोधात फिर्यादी पोनि मनोज गोडसे यांची भ्र.प्र.अधि. कलम 7 अन्वये कायदेशिर फिर्याद आहे म्हणून गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोलीस निरीक्षक अशोक गवारी, ला.प्र.वि. मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..........

(3) Transferred to P. S. ..........
District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

(signature)
(मनोज गोडसे)
पोनि. ला.प्र.वि.मुंबई

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

(signature)

संपूर्ण नाव Name अशोक गवारी

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. Posting लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

| प्रत<br>Copy to | 2 फिर्यादी,<br>2. Complainant, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक),<br>3. Supdt. of Police (Computer), | 4. तपासिक अंमलदार,<br>4. Inv. Officer, | 5. स्थळ प्रत.<br>5. Office Copy. |
|---|---|---|---|---|

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner